नियमित दिवाणी दावा क्र.४०३/२०२५

MHSO160018062025

शितल पोळ व इतर वि योगिता लुंकड व इतर

निशाणी १८ कलम १५१ प्रमाणे दिलेल्या अर्जाखाली आदेश

(आदेश पारित दि. ०६/१२/२०२५.)

१. प्रस्तुत अर्ज वादींनी प्रतिवादी क्र. १ ते ८ विरूध्द जैसे थे (स्टेटस–को) आदेश मिळण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादींच्या कथनानुसार वादींनी प्रस्तुत दावा प्रतिवादींविरूध्द निरंतर ताकीदीचा व जाहीरनामा होवून मिळण्याबाबत दाखल केलेला आहे. वादींच्या कथनानुसार प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी वादी व प्रतिवादी क्र. ९ ते १४ विरूध्द तहसिलदार करमाळा यांच्याकडे क्र.जमा–२/एस आर/२५/२०२१ दिनांक २२/१२/२०२१ च्या बेकायदेशीर आदेशानुसार तात्पुरता मोजणी करेपर्यंत रस्ता मंजूर केला व तोच रस्ता पोलिस बंदोबस्तात खुला करण्याचा नव्याने आदेश तहसिलदार करमाळा यांनी क्र.जमा–२/का वि/८५०/२०२५ दिनांक २०/११/२०२५ रोजी दिला असून सदरचा आदेश हा बेकायदेशीर रद्द होवून मिळण्याबाबत वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादींविरूध्द दाखल केला असून तो आदेश दाव्याचा मुख्य विषय आहे.

३. वादींच्या कथनानुसार तहसिलदार यांनी पारीत केलेल्या आदेशानुसार प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी दिनांक १२/११/२०२५ रोजीच्या तहसिलदार यांच्या पत्रानुसार दिनांक ०८/१२/२०२५ रोजी पोलिस बंदोबस्त मिळून रस्ता खुला करण्याचा आदेश घेतला असल्यामुळे जर प्रतिवादी त्यात यशस्वी झाले तर वादींवर अन्याय होवून वादींचा अपरिमानीत नुकसान होणार असल्यामुळे त्यांनी प्रस्तुत प्रकरणात निशाणी ०५ वरील आदेश होईपर्यंत जैसे थे आदेश मिळण्याबाबत विनंती केली.

४. प्रतिवादी क्र. १,२,४,६ ते ७ तर्फे श्री.व्ही.व्ही.बागल वकील यांनी त्यांचे म्हणणे सादर करून अर्जाला विरोध केला. प्रतिवादीच्या वकीलांनी वादींनी सर्व

प्रतिवादींना नोटीस तामील केली नसल्यामुळे तसेच ते प्रस्तुत प्रकरणात हजर नसल्यामुळे त्यांच्या विरूध्द दाद देणे योग्य होणार नसल्याचे कथन केले. प्रतिवादीच्या वकीलांनी पुढे त्यांच्या जबाबात तहसिलदार यांनी दिनांक १२/१२/२०२१ व दिनांक २०/११/२०२५ रोजी पारीत केलेले आदेश हे गैरकायदेशीर असल्याची दाद मागण्याचे कोणतेही हक्क व अधिकार नसल्याचे कथन केले. प्रतिवादीच्या वकीलांनी प्रतिवादी वाद मिळकतीत जे.सी.बी, ट्रॅक्टर व मजूराच्या सहाय्याने नवीन रस्ता पोलिस मदत घेवून तयार करत असल्याबाबत कोणतीही ठोस माहीती प्रस्तुत प्रकरणात दाखल केली नसल्यामुळे त्यांनी वादींचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

५. निशाणी १८ वरील अर्जाचे तसेच निशाणी १९ वरील जबाबाचे अवलोकन केले. वादींतर्फे श्री. बी.टी.हिरडे वकील व प्रतिवादी क्र १,२,४,६ ते ७ तर्फे श्री.व्ही.व्ही.बागल वकील यांचा युक्तीवाद ऐकला.

६. प्रस्तुत दावा वादींनी प्रतिवादींविरूध्द निरंतर मनाई हुकूम व जाहीर ठराव मिळण्याबाबत दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यात वादींनी तहसिलदार करमाळा यांनी दिनांक २२/१२/२०२१ रोजी प्रकरण क्र. जमा–२/एस आर/२५/२०२१ रोजी आदेश पारीत करून वाद मिळकतीच्या पश्चिम बांधाने प्रतिवादी क्र. १ ते ८ यांचा वहिवाटीचा रस्ता मंजूर केल्याबाबत व तो रस्ता तहसिलदार यांनी दिनांक २०/११/२०२५ रोजी प्रकरण क्र. जमा–२/का वि/८५०/२०२५ नुसार खुला करून देण्याबाबत आदेशित केलेले आहे. सदर अर्जाला अनुसरून तहसिलदार करमाळा यांनी प्रतिवादी क्र. १ ते ८ च्या हक्कात दिनांक २०/११/२०२५ रोजीच्या अर्जाला अनुसरून विवादीत रस्ता खुला करून देण्याकरीता दिनांक ०८/१२/२०२५ रोजी प्रतिवादी क्र. १ ते ८ च्या हक्कात पोलिस संरक्षण दिलेले आहे.

७. प्रस्तुत दाव्यामार्फत वादींनी तहसिलदार यांनी दिनांक २२/१२/२०२१ रोजी व दिनांक २०/११/२०२५ रोजी पारीत केलेले आदेश आव्हानित केलेला आहे. वादींनी दिनांक ०५/१२/२०२५ रोजी दावा दाखल केला व प्रतिवादी क्र. १ ते ८ ला आज रोजी विशेष बेलिफ मार्फत नोटीस तामील करून आज

प्रकरण ठेवण्यात आले. प्रतिवादी क्र. १,२,४,६ ते ७ तर्फे श्री.बागल वकील आज हजर झाले. प्रकरणाची वस्तुस्थिती लक्षात घेता दिनांक ०८/१२/२०२५ रोजी प्रतिवादी क्र. १ ते ८ च्या हक्कात तहसिलदाराच्या आदेशाप्रमाणे पोलिस बंदोबस्त देण्यात आलेला आहे व सदर पोलिस मदतीव्दारे विवादीत रस्ता प्रतिवादी क्र. १ ते ८ वादीच्या वाद मिळकतीतून करणार असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्यामुळे वादींनी विनंती केल्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणात निशाणी ०५ चे आदेश होईपर्यंत जैसे थे परिस्थिती ठेवणे गरजेचे आहे. या ठिकाणी मी वादींनी निशाणी १८ वर दाखल केलेल्या अर्जानुसार व प्रतिवादींनी निशाणी १९ वर दिलेल्या जबाबानुसार प्रकरणाच्या गुणवत्तेमध्ये न जाता फक्त निशाणी १८ च्या विचारार्थ प्रस्तुतचा आदेश पारीत करीत आहे. वादींनी दिनांक ०५/१२/२०२५ रोजी दावा दाखल केल्यामुळे तसेच आज दिनांक ०६/१२/२०२५ रोजी काही प्रतिवादी हजर झाल्यामुळे त्यांना त्यांची बाजू मांडण्याकरीता योग्य संधी देणे गरजेचे आहे. अशा परिस्थितीमध्ये जर तहसिलदार यांचा पोलिस संरक्षणाचा दिनांक २०/११/२०२५ रोजीचा आदेश अंमलात आला तर वादींचे दावा दाखल करण्याचे उददेश विफल होवून वादींचे अपरिमानीत नुकसान होईल. जर निशाणी ०५ च्या आदेश पर्यंत तहसिलदार यांच्या आदेशाला स्थगिती दिली तर वादी व प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नसून दावा गुणवत्तेच्या आधारे निकाली काढण्यास मदत होईल. त्यामुळे एकंदरीत प्रकरणाची स्थिती लक्षात घेता मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१. वादींचा निशाणी १८ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ८ यांना आदेशीत करण्यात येते की त्यांनी तहसिलदार करमाळा यांनी दिनांक २०/११/२०२५ रोजी प्रकरण क्र. जमा–२/का वि/८५०/२०२५ व दिनांक २२/१२/२०२१ रोजी प्रकरण क्र. जमा–२/एस आर/२५/२०२१ प्रमाणे निशाणी ०५ चा अंतिम निकाल होईपर्यंत स्वतः अथवा इतरांमार्फत कोणताही नवीन रस्ता तयार करू नये.

३. वादींना आदेशीत करण्यात येते की त्यांनी प्रतिवादी क्र. ९ ते १४ यांच्या विरूध्द तात्काळ स्टेप्स घेवून प्रकरण जलद गतीने चालवून घ्यावे.

४. वादी व प्रतिवादींना आदेशीत करण्यात येते की त्यांनी जलद गतीने प्रस्तुतचा खटला चालवून घ्यावा.

५. वादींना आदेशीत करण्यात येते की जर त्यांनी जाणून बुजून प्रकरण चालविण्यास टाळाटाळ केली तर निशाणी १८ वरील आदेश केव्हाही रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

AMIT KISHORE SHARMA

Digitally signed by AMIT KISHORE SHARMA
Date: 2025.12.06 17:12:58 +0530

दिनांक – ०६/१२/२०२५

(अ.कि.शर्मा)

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, करमाळा